

## सेवानिवृतीच्या दिवशीच दिले निवृत्तीचे लाभ

**विरार :** नियत वयोमानानुसार वसई-विरार महानगरपालिकेचे ४ अधिकारी-कर्मचारी सोमवारी सेवानिवृत्त झाले. आयुक्त अनिलकुमार पवार यांच्या उपस्थितीत महानगरपालिका मुख्यालयाच्या सभागृहात सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी यांचा सेवापूर्ती सोहळा पार पडला असून या अधिकारी कर्मचाऱ्यांना ७३ लक्ष रुपयांच्या सेवानिवृत्ती लाभाचे धनादेश देण्यात आले. दिलीप पालव (प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी), शशिकांत किणी (वरिष्ठ लिपिक), कॅजिटन वाझ (लिपिक), शशिकांत नाईक (सफाई कामगार) हे कर्मचारी नियत वयोमानानुसार ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले. यावेळी सर्व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचा आयुक्त पवार यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला. तसेच सेवानिवृत्तीनंतरच्या लाभाचे धनादेशही यावेळी निवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना देण्यात आले. सर्व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना मिळून एकूण ७३,३७,९५६/- रु.चे सेवानिवृत्ती लाभाचे धनादेशाचे यावेळी वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास आयुक्त अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, अतिरिक्त आयुक्त दीपक सावंत, महानगरपालिकेचे सर्व उप-आयुक्त, सहाय्यक आयुक्त, विभाग प्रमुख, सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी व त्यांचे नातेवाईक, महानगरपालिका कर्मचारी उपस्थित होते.

# 'जर टोल घेत असाल, तर सुविधा देखील द्या'

**प्रशासनाच्या बेजबाबदारपणा विरोधात आमदार विलास तरे यांची आक्रमक भूमिका**

◆ **सफाळे (प्रतिनिधी) :**



मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ वर खानिवडे टोल नाक्यावर सातत्याने निर्माण होणारी अति तीव्र वाहतूक कोंडी, रस्त्यांची दयनीय अवस्था आणि प्रशासनाचा बेजबाबदारपणा याविरोधात बोईसरचे आमदार विलास तरे यांनी ठाम आणि आक्रमक भूमिका घेतली आहे.

खानिवडे टोल नाक्यावर दररोज एक ते दोन तास वाहनांच्या रांगा लागतात, परिणामी नागरिक, विद्यार्थी, रुग्ण, महिला यांना प्रचंड हाल सहन करावे लागतात. या गैरव्यवस्थेचा प्रत्यक्ष अनुभव घेत आमदार तरे यांनी तब्बल दोन तास खुद्द टोल नाक्यावर थांबून वाहतूक सुरळीत केली. "मी लोकप्रतिनिधी असून जनतेच्या वेदना समजून घेतल्या पाहिजेत, मी ते माझ्या कर्तव्याचा भाग समजतो," असे सांगत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच फैलावर घेतले.

रस्त्यांची अवस्था - मृत्यूचे सापळे आमदार तरे यांनी यावेळी उपस्थित पत्रकारांशी बोलताना सांगितले की, "पालघर जिल्ह्यातील ससूपाडा (ता. वसई) ते आचड (ता. तलासरी) दरम्यान महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी पडलेले मोठमोठाले खड्डे हे अक्षरशः मृत्यूचे सापळे बनले आहेत. या रस्त्यांमुळे गेल्या एका वर्षात सुमारे १७९ निरपराध लोकांनी अपघातात आपला जीव गमावला आहे. हे बळी अपघाताचे नसून, प्रशासनाच्या दुर्लक्षाचे आणि टोल वसूल करून देखभाल न करणाऱ्या यंत्रणेचे आहेत," असा घणाघात त्यांनी केला.

"टोल घेताय, पण सुविधा कुठे?" भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या नियमांनुसार टोल नाक्यावर वाहन जास्तीत जास्त १० मिनिटांपेक्षा अधिक थांबता कामा नये.

त्यापेक्षा जास्त वेळ लागल्यास टोल शुल्क माफ करावे, हा नियम आहे. मात्र प्रत्यक्षात वाहनचालकांना एक-एक, दोन-दोन तास रांगेत उभे राहावे लागते, आणि त्याच वेळी त्यांच्याकडून बिनधास्त टोल वसूल केला जातो. हे सरळसरळ अन्यायकारक आणि फसवणुकीचे उदाहरण असल्याचे आमदार तरे यांनी ठणकावून सांगितले.

टोल बंद करा नाहीतर आम्ही रस्त्यावर उतरू "जर टोल घेत असाल, तर सुविधा देखील द्या. अन्यथा हा टोल वसूल करण्याचा तुम्हाला कोणताही नैतिक अधिकार नाही. रस्त्यांवर खड्डे, टोल नाक्यावर कोंडी, अपुऱ्या सुविधा आणि नागरिकांची रोजची फरपट... हे सगळं असह्य झालं आहे. वेळेत उपाययोजना न झाल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन केल्याशिवाय पर्याय राहणार नाही," असा थेट इशाराही आमदार तरे यांनी दिला.

जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका – व्यवस्था सुधारा! हे संपूर्ण प्रकरण फक्त रस्त्यांची दुरवस्था किंवा टोल कोंडीपुरते मर्यादित नाही, तर हे शासन, प्रशासन व खासगी टोल व्यवस्थापन कंपन्यांच्या निष्काळजीपणाचे मूर्त उदाहरण आहे. "आम्ही विकासाला विरोध करत नाही, पण विकासाच्या नावाखाली फक्त लुट चालू आहे, आणि त्याचा बळी सामान्य माणूस ठरत आहे," असेही आमदार तरे यांनी ठणकावून सांगितले. या प्रसंगी शिवसेनेचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**महावितरणकडून पाठपुरावा करण्याचे आश्वासन**

# ग्रामीण भागातील वीज समस्यांवर मंथन




◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे ग्रामस्थांच्या तक्रारी, त्यावर महावितरण अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेत उपाययोजना करण्यासाठी पालघरचे आमदार राजेंद्र गावित यांनी बैठक घेतली. या बैठकीला महावितरणचे कार्यकारी अभियंता सुनील भारंबे, ग्रामस्थ, सरपंच आदींची उपस्थिती होती.

ग्रामीण भागात अनेक ठिकाणचे विद्युत खांब जीर्ण झाले आहेत, विद्युत रोहित्र उघडी आहेत, एका फिडरवर अधिक दाब येत असल्याने वारंवार वीज पुरवठा खंडित होतो. अशा प्रकारे अनेक तक्रारी ग्रामस्थांकडून बैठकीत करण्यात आल्या.

महावितरणकडून बसविण्यात येणाऱ्या स्मार्ट मीटरला जिल्ह्यातील नागरिकांचा विरोध असून महावितरणने स्मार्ट मीटर बसवू नये अशा सूचना शिवसेनेचे जिल्हा प्रमुख कुंदन संखे यांनी दिल्या. समुद्रकिनारी असलेल्या गावांमधील विद्युत तारा जीर्ण झाल्या आहेत. त्यामुळे नवीन भूमिगत विद्युत वाहिन्या टाकण्यात याव्या, सिंगल लाइनऐवजी थ्री फेज लाईन टाकण्यात यावी, अनेक ठिकाणी उघड्या तारा आहेत त्यामुळे पावसाळ्यात अपघात होण्याची शक्यता असल्याने यावरही उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे बोईसर ग्रामीण व सरावली सेक्शन एकत्र असल्याने या भागात विजेचा जास्त दाब येऊन या भागात अनेकदा पुरवठा खंडित होतो. परिणामी बोईसर ग्रामीण व सरावली सेक्शन वेगवेगळे करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. ग्रामस्थांनी मांडलेल्या सर्व समस्या सोडविण्यात येतील अशी ग्वाही सुनील भारंबे यांनी याप्रसंगी दिली.

## वेचक

### बसचा अपघात; १४ प्रवासी जखमी

**पालघर :** डहाणू आगारातून छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या बसचा मंगळवारी सकाळी १० वाजता कासा जव्हार मार्गावर कवडास येथील वळणावर अपघात झाला आहे. या अपघातात १४ प्रवासी जखमी झाले आहेत. कवडास येथील वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे बस रस्त्याच्या डाव्या बाजूला पलटली. अचानक झालेल्या अपघातामुळे बसमधील प्रवासी गोंधळून गेले असून १४ प्रवासी जखमी झाले आहेत. चालक आणि वाहकांनी प्रवाशांना आपत्कालीन मार्गाने बसमधून बाहेर काढले. बसमध्ये एकूण २८ प्रवासी होते. यातील १४ प्रवासी जखमी झाले आहेत. जखमींवर कासा उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असून लक्ष्मी ओझरे (६५) आणि शोभा मेंडगे (६५) ह्या दोन महिला प्रवासी गंभीर जखमी आहेत.



### वाडा तालुक्यात १०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप




**वाडा :** शहराच्या झगमगाटापासून दूर, वाडा तालुक्याच्या लहान गावांमध्ये काही लहानशा शाळा, नदीपाडा-उमरोठे, ऐनशेत आणि बिलघर. इथे शिकणाऱ्या मुलांकडे स्मार्टफोन नाहीत, पण शिकण्याची तीव्र इच्छा आहे. पुस्तकं कमी आहेत, पण जिद्द भरपूर आहे. याच मुलांच्या हसऱ्या चेहऱ्यांवर अधिक उजाळा देत, रोट्रॅक्ट जिल्हा ३१४१ तर्फे १०० शालेय कीट्स वाटण्यात आले. हे केवळ पेन, वह्या, रंग आणि बॅग नव्हते – तर ही होती आशेची भेट, स्वप्नांचे दफ्तर. डीआरआर निकिता सुनील यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. या वाटपावेळी पोलीस उपनिरीक्षक सुमेध मेधे हे प्रमुख पाहुणे होते. त्यांनी रोट्रॅक्टच्या कार्याचे मनापासून कौतुक केले. हा उपक्रम फक्त इथं थांबणार नाही. रोट्रॅक्ट जिल्हा ३१४१ आणखी शाळांसाठी, आणखी विद्यार्थ्यांसाठी कीट्स संकलनासाठी प्रयत्नशील आहे.

# भूमिहीन आदिवासींना मिळालेल्या जमिनीचा ठावठिकाणा मिळेना...

◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

१९७२ साली पालघर पूर्वेकडील आदिवासी आणि अन्य जमातीचे मागासलेल्या भूमिहीन लोकांना पीक लागवडीसाठी शासनाकडून देण्यात आलेल्या जमिनी आज मितीस लागवडी विनाच असल्याचे समोर आले आहे. वन जमिनी तत्कालीन वेळेत भूमिहिनांना वाटप करताना प्लॉटना चतुःसीमा निर्धारित केले नसल्याने मालकी हक्काबाबत संभ्रमता निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाकडून वाटप करण्यात आलेल्या बहुतांश या जमिनी लागवडीपासून वंचित असल्याचे समोर आले आहे. या जमिनी हस्तांतरणाचे आदेश ११ मे १९७२ रोजीच्या फेरफार क्रमांक ९०० ने झाले होते.

महाराष्ट्र शासनाच्या भूमिहीन आदिवासी आणि इतर मागासलेले जातीचे लोकांना लागवडीसाठी जमीन उपलब्ध करून देण्याच्या धोरणानुसार वन विभागाच्या जमिनी मोरवाळी गावातील तत्कालीन सर्व्हे क्रमांकातील वन जमिनी देण्यात आल्या. त्यासाठी शासनाने ठराव क्रमांक : महसूल वन विभाग क्र. एल.एन.डी.१०६९/१४५३२१ अ-१ दिनांक १३ जानेवारी १९६६ रोजीचा आधार घेण्यात आला होता. त्यानुसार मोरवाळी मधील सर्व्हे क्रमांक १५ मध्ये तत्कालीन धारकांना जमिनी देण्यात आल्या.

खरा घोळ तेव्हा सुरु झाला जेव्हा मोरवाळीसह अन्य गावे वेवूरमध्ये समाविष्ट करून महसुली गाव तयार करण्यात आले. महसूल विभागाच्या दुर्लक्षपणामुळे मोठा घोळ झाला होता.ती दुरुस्त करण्यासाठी तत्कालीन तहसीलदार सुरेंद्र नवले यांनी दिनांक २० डिसेंबर २०१२ रोजी तत्कालीन जिल्हा निरीक्षक भूमी अभिलेख ठाणे यांना लेखी पत्रान्वये कळविले. त्या नंतर मोरवाळी येथील १ ते २१ सर्व्हे क्रमांक महसुली वेवूर मध्ये समाविष्ट होऊन १३५ ते १५५ असे उल्लेख शासकीय दप्तरात नमूद झाले आहे. महसूल गावे निर्माण करताना एकत्रीकरणात झालेल्या घोळामुळे स्थानिक पातळीवर अनेक जमीन धारकांमध्ये मालकी हक्कांबाबत संघर्ष निमाण झाला आहे. यासाठी जिल्हाधिकारी यांनी एक समन्वय समिती स्थापन करून गावपातळीवरील तंटे मिटविण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

# वाडा तालुक्यात हिवताप जनजागरण महिना साजरा

◆ **वाडा (वार्ताहर) :**

हिवतापाविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण होऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीकरिता त्यांचा सक्रिय सहभाग प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक वर्षी विविध उपक्रमांद्वारे नागरिकांपर्यंत माहिती पोहोचविण्यासाठी हिवताप दिन एवढा एकच दिवस जनजागृती करुन न थांबता संपूर्ण महिना १ ते ३० जून २०२५ हा हिवताप जनजागरण महिना म्हणून साजरा करण्याबाबत शासन स्तरावरुन निर्देशित करण्यात आले होते. त्या दृष्टीने जून महिन्यात तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत विविध जनजागरण कार्यक्रम राबवण्यात आले. या जनजागरणाच्या कार्यक्रमावेळी तालुक्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांमध्ये मार्गदर्शन, प्रभात फेरी, गावागावात होम टू होम जनजागरण कार्यक्रम घेण्यात आले.



पावसाळ्यात हिवताप, डेंग्यू, चिकुनगुनिया, हत्तीरोग इत्यादी आजारांच्या डासांची मोठ्या प्रमाणात पैदास झाल्यामुळे या रोगाचा प्रसार होत असतो. सदर जनजागरण मोहिमेमधून हिवतापाची लक्षणे, उपचार व हिवताप प्रतिरोधाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे. कीटकजन्य आजार नियंत्रणाच्या विविध उपायामुळे या आजाराच्या प्रसाराला वेळीच आळा घालण्यासाठी व जंतुभार कमी करण्यासाठी रुग्णांनी संपूर्ण उपचार घेणे तसेच घर व परिसरात डासोत्पत्ती स्थानाची निर्मिती होऊ न देणे आवश्यक असल्याचे तालुका हिवताप पर्यवेक्षक एस. एस. पाटील यांनी माहिती देताना सांगितले. ताप आल्यास रुग्णांनी रक्ताची तपासणी अवश्य करावी. हिवताप झाल्याचे निदान झाल्यावर रुग्णास हिवतापाचा संपूर्ण उपचार आवश्यक आहे. स्वच्छ परिसर ठेवल्यास डासांची भरमसाट वाढ होत नाही. झोपतेवेळी मच्छरदाणीचा वापर अवश्य करावा. तीव्र ताप, तीव्र डोकेदुखी, उलट्या अशी लक्षणे ही हिवतापाची धोकादायक लक्षणे असतात, अशावेळी रुग्णास तत्काळ शासकीय दवाखान्यात दाखल करावे, असे आवाहन जनजागरण कार्यक्रमावेळी प्रा. आ केंद्र खानिवलीच्या वैद्यकीय अधिकारी अश्विनी पवार यांनी केले आहे. जनजागरण कार्यक्रमावेळी चारीही प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यक, आरोग्य निरीक्षक, आशा तसेच नागरिक, विद्यार्थी यांचा सहभाग होता.

**जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांची माहिती**

# जिल्ह्यात राबविणार विशेष आर्थिक साक्षरता मोहीम

◆ **पालघर (प्रतिनिधी) :**

भारत सरकार अर्थ मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागाच्या निर्देशानुसार पालघर जिल्ह्यात १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत विशेष आर्थिक साक्षरता मोहीम प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर जिल्ह्यातील विविध बँकेमार्फत राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड, यांनी दिली आहे.

सामान्य नागरिकांमध्ये विशेषतः ग्रामीण भागातील महिला, ज्येष्ठ नागरिक, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकामध्ये वित्तीय जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. यामध्ये प्रधानमंत्री जनधन योजनेअंतर्गत नवीन खाते उघडणे, केवायसी करणे, तसेच डिजिटल आर्थिक साक्षरता, जबाबदारीने कर्ज घेणे,



आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी जागरूकता, तसेच प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना या सामाजिक सुरक्षा योजनेची माहिती दिली जाणार आहे.

जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयीकृत बँका, खासगी बँका, डीसीसी बँक यांच्या ग्रामीण शाखा या मोहिमेत सहभागी होणार आहेत. बँकेच्या शाखेमार्फत शिबिरे, गावोगावी जाऊन जनजागृती आणि प्रचार कार्यक्रम राबविले जाणार आहेत. दुर्गम व दुर्लक्षित भागापर्यंत वित्तीय सेवा पोहोचविण्यावर विशेष भर दिला जाणार असून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. जाखड यांनी सांगितले.

सर्व नागरिक स्वयंसहायता समूह, ग्रामस्तरीय अधिकारी, पंचायत प्रतिनिधी स्थानिक प्रसार माध्यमांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. अधिक माहितीसाठी किंवा आपल्या परिसरातील जनजागृती कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नजीकच्या बँक शाखेशी किंवा पालघर जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. इंदुराणी जाखड यांनी केले आहे.

**छोट्या जाहिराती**

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM Old Name **URMILABEN ARVINDBHAI PAREKH** TO New Name **URMILABEN ARVINDKUMAR PAREKH** AS PER ADHAR CARD

**प्रहार** मुंबई

**वाचकांना विनम्र सूचना**

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिराती आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'प्रहार' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'प्रहार' वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

## उज्जीवन स्मॉल फायनांस बँक

**नोंदणीकृत कार्यालयः** ग्रेप गार्डन, क्र. २७, ३ रा "ए" क्रॉस, १८ वा मेन, ६ वा ब्लॉक, कोरामंगलम बेंगळूरू – ५६००९५, कर्नाटक
क्षेत्रिय कार्यालयः ७ वा मजला, अलमोन्टे आयटी पार्क, सर्व्हे क्र. ८ खराडी-मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ८(६) आणि ९ सह वाचल्या जाणाऱ्या सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना**

उज्जीवन स्मॉल फायनांस बँक लि. चे अधिकृत अधिकारी म्हणून अधोस्वाक्षरीने, सरफेसी कायदा च्या कलम १३ (४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील तारण मालमत्तेचा सार्वजनिक लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे" तत्वावर खाली नमूद दिनांकाला करण्यात येईल.

| अनु. क्र. | कर्ज खाते क्र./ शाखा | कर्जदार/ सह-कर्जदार/ हमीदार/ गहाणदारांचे नाव | १३ (२) सूचना दिनांक/ थकीत देणी (रु. मध्ये) अनुसार | ताब्याचा दिनांक | राखीव मूल्य आयएनआर मध्ये/ इरठे आयएनआरमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 4412210090000023 / 4412- ठाणे | **१) मे बाबूराव हरिभाऊ थोरवे आणि कं,** येथे राहणारः एन-९७३, एपीएमव्ही मार्केट, फ्रूट सेक्टर. सेक्टर-१९, तुर्भे , नवी मुंबई-४००७०५. **२) श्री. प्रशांत उल्हास थोरवे, ३) श्रीमती. आशा प्रशांत थोरवे,** दोघेही येथे राहणार महाराज ईमारत, १ ला मजला रूम क्र.९, ४५/४९, बोरा-बाजार स्ट्रीट, भाटिया बाग, जी. पी.ओ. समोर., फोर्ट, मुंबई-४००००१. | २५.११.२०२२/ २३.११.२०२२ अनुसार रु. ३८,१९,५९३.६८ | 07.12.2024 | Rs.1,08,00,000 / Rs.10,80,000/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** गाव तुर्भे तालुका आणि जिल्हा ठाणे येथे वसलेल्या जमिनीचा ज्ञात असलेला प्लॉट क्र. ३ आणि ७, सेक्टर १९, वाशी नोड नवी मुंबई गट क्र. ७९६ पैकी वर असलेल्या एपीएमसी फ्रुट मार्केट ब्लॉक एनमधील २८.१२५ चौ. मी. म्हणजेच ३०० चौ. फू. मोजमाप असलेला लहान फ्रुट गाळा क्र. ९७३, ज्यापैकी तळ मजल्यावर २०० चौ. फू. आणि पहिल्या मजल्यावरील १०० चौ. फू. ची सर्व जागा. सीमा पुढील प्रमाणे : उत्तर : गाळा क्र. एन-९७८; दक्षिणः गाळा क्र. एन - ९६८; गाळा क्र. एन- ९७४; पश्चिमः गाळा क्र. एन - ९७२ | | | |
| 2 | 4416210150000002 4416210130000067 / 4416- कल्याण | **१) राजेंद्र दत्तात्रय व्यास, २) कविता राजेंद्र व्यास,** दोघेही येथे राहणार सदनिका क्र. ०५, तळ मजला, इमारत क्र. १, माऊली पार्क, तलाव रोड, द्वारका शाळेजवळ, कल्याण पूर्व, ठाणे – ४२१३०६ **आणि येथे देखील :** १/५ मा संतपोशी कॉलनी, शंकर पावशे रोड, हनुमान नगर, काटेमानिवली, कल्याण ठाणे ४२१३०६. १) **येथे देखील** : सी/ ओ पुराणिक बिल्डर्स लि., पुराणिकज वन, कांचन पुष्पा कॉम्प्लेक्स, सुरज वॉटर पार्क समोर, कावेसर, घोडबंदर रोड, ठाणे ४००६०७ | ०४.०७.२०२२ / ०२.०७.२०२२ अनुसार रु. १४,५२,२८८.०६ | 20.01.2025 | Rs.12,10,000/- / Rs.1,21,000/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** गाव नांदिवली तर्फे अंबरनाथ, तालुका – कल्याण जिल्हा ठाणे येथील सर्व्हे क्र. ५, हिस्सा क्र. १ येथे वसलेल्या माऊली पार्कच्या इमारत क्र. १ च्या तळ मजल्यावरील सदनिका क्र. ०५ चा सर्व खंड आणि भूखंड. जमिनीच्या सीमाः पूर्वः दुन्दा गणू आणि अन्य ह्यांची इमारत, पश्चिमः नारायण गोविंद आणि अन्य ह्यांची जमीन, उत्तरः शनिवार दामू आणि अन्य ह्यांची खुली जमीन; दक्षिणः हरिचंद्र काथोड ह्यांची खुली जमीन. | | | |
| 3 | 4412210090000001 / 4412- ठाणे | **१) शहाबुद्धीन फुल मोहमद अन्सारी, २) श्रीमती नूरजहां शहाबुद्धीन अन्सारी,** खोली क्र. ३८२, नंदी नाका, म्हाडा कॉलनी, वाडा रोड, भिवंडी, ठाणे ४२१३०२ | ०४.०७.२०२२/ ०७.०६.२०२२ अनुसार रु. २१,९७,८४६.२४/- | 20.01.2025 | Rs.28,99,000/- / Rs.2,89,900/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन : युनिट क्र. २०७/ २, मोजमाप साधारणपणे १६८० चौ. फू. गार्डन मागे, दिल्ली दरबार ढाब्याजवळ, ऑफ नासिक रोड, धारण केलेला सर्वे क्र. २४/२, भिवंडी, गाव सावंधे ठाणे ४२१३०२. | | | |
| 4 | 4505210130000025 / 4505- विरार | **१) धर्मेश बाबा यादव, २) श्रीमती चंदा देवी धर्मेश यादव,** दोघेही येथे राहणारः सदनिका क्र. १०१, १ ला मजला, बोईसर, ता. पालघर बोईसर ता. पालघर ठाणे, महाराष्ट्र ४०१५०१ आणि **येथे देखीलः** खोली क्र. २ दांडी पाडा, यादव चाळ, साई सागर, शिगाव, महाराष्ट्र ४०१५०१ | ११.१०.२०२१ २९.०९.२०२१ अनुसार रु. २२,१९,८१०/- | 30.01.2025 | Rs.13,20,000/- / Rs.1,32,000/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** सारवली, तालुका पालघर जिल्हा पालघर येथे वसलेल्या सर्व्हे क्र. ७, प्लॉट क्र. डी वर बांधण्यात आलेल्या त्रिवेदी नगर, एम श्री रामकृपा हाऊसिंग सोसायटी लि., म्हणून ज्ञात असलेल्या कॉंप्लेक्समधील विंग/ इमारत क्र. डी ३ च्या २ ऱ्या मजल्यावरील ५५० चौ. फू बिल्टअप क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. १२ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| 5 | 4411210130000516 / 4411- कोपरखैरणे | **१) मिनिता मनोहर खापणे, २) दिवाकर दत्तात्रय मुगुटराव** दोघेही येथे राहणारः खोली क्र. ००२, सुदामा सृष्टी कॉ-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. (अपार्टमेंट), तळ मजला, नांदिवली टेकडी, बामणदेव रोड, डोंबिवली पूर्व, ठाणे महाराष्ट्र – ४२१२०१. १) आणि **येथे देखीलः** नांगरफळे, वाडी, दत्त मंदिराजवळ, प्रभानवल्ली, तालुका लांजा, जिल्हा रत्नागिरी, ४१६७०१ आणि **येथे देखीलः** मे प्रिंट सोल्युशन्स, १ साफिराज सदन, प्लॉट क्र. ३६, वाशी रेल्वे स्टेशन जवळ, सानपाडा (पूर्व), नवी मुंबई ४००७०५ | २७.०३.२०२३ २१.०२.२०२३ अनुसार रु. २१,२१,१४८.८४ | 10.12.2024 | Rs.10,95,000/- / Rs.1,09,500/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** नोंदणीकरण जिल्हा ठाणे, उप जिल्हा कल्याण मधील कल्याण डोंबिवली महानगरपालिका हद्दीमधील नोंदणीकरण जिल्हा ठाणे, गाव नांदिवली तर्फे पंचानंद, ता. कल्याण जिल्हा ठाणे येथे वसलेल्या एकूण २५०० चौ. मी. मोजमापाच्या जमिनीपैकी विकासासाठी वाटप करण्यात आलेल्या २५० चौ. मी. मोजमापाचा धारण केलेला सर्व्हे क्र. ७४, हिस्सा क्र. १ पार्ट, वर वसलेल्या नांदिवली, डोंबिवली पूर्व येथे वसलेल्या तळ + ५ (पाच) वरील मजले असलेल्या सुदामा सृष्टी च्या तळ मजल्यावरील ४०० चौ. फू. म्हणजेच ३७.१७ चौ. मी. बिल्ट अप क्षेत्रफळ असलेली सदनिका क्र. ००२. | | | |
| 6 | 4505210130000084 / 4505- विरार | **१)शकुंतला हरिशंकर श्री जयस्वाल, २) रामनिवास रामसरम जयस्वाल,** दोघेही येथे राहणारः खोली क्र. ३०६, साई नयन अपार्टमेंट, ओसवाल नगर, तुळींज बाबा संकुल, नाला सोपारा, पालघर, महाराष्ट्र ४०१२०९ | ०६.०६.२०२२ ०२.०५.२०२२ अनुसार रु. १२,९३,४०९.०० | 23.09.2024 | Rs.5,60,000/- / Rs.56,000/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन :** गाव गासकोपरी, तालुका वसई आणि जिल्हा पालघर येथे असलेल्या आणि वसलेल्या एन. ए. जमिनीचा धारण केलेला सर्व्हे क्र. १, हिस्सा क्र. ५/ ५, वर बांधण्यात आलेल्या "श्री साई माऊली अपार्टमेंट" म्हणून ज्ञात इमारतीच्या तळ मजल्यावरील ३२.५२ चौ. मी. (सुपर बिल्टअप क्षेत्र) क्षेत्रफळाच्या निवासी मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ०२ ची सर्व स्थावर मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड. प्लॉट/ मालमत्तेच्या सीमा पुढीलप्रमाणेः पूर्वः अंतर्गत रोड, पश्चिमः चाळ, उत्तरः जे पी स्कूल दक्षिणः खुला प्लॉट. | | | |
| 7 | 4420210130000035 / 4420- डोंबिवली | **१) चंद्रकांत किसन अबनावे, २) सुषमा चंद्रकांत अबनावे,** दोघेही येथे राहणारः खोली क्र. ०२, श्री सदन अपार्टमेंट, तळ मजला, सिद्धिविनायक नगर, दिवा (पू), ठाणे ४००६१२. | ११.०८.२०२३/ ०८.०८.२०२३ अनुसार रु. १५,१८,३६२.६०/- | 02.12.2024 | Rs.10,92,000/- / Rs.1,09,200/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** ठाणे महानगरपालिका हद्दीमधील गाव देतीवली, दिवा-देतीवली रोड, दिवा (पू), तालुका आणि जिल्हा ठाणे – ४००६१२ येथील एस. क्र. १४३, हिस्सा क्र. २ वर बांधण्यात आलेल्या "श्री सदन" म्हणून ज्ञात असलेल्या इमारतीच्या तळ मजल्यावरील ५२० चौ. फू. (बिल्टअप मोजमाप) असलेल्या मालमत्तेचा धारण केलेला सदनिका क्र. ००२ चा सर्व खंड आणि भूखंड. | | | |
| 8 | 4411210180000005 / 4411- कोपरखैरणे | **१) उत्तम बबनराव अम्ब्राले, २) श्रीमती चबाबाई अम्ब्राले,** दोघेही राहणार सदनिका क्र. जी-३, तळ मजला, घर क्र. १३२, रेणुका निवास, रंजनदेवी मंदिराजवळ, सेक्टर – १९, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९ | २०.१२.२०२२/ १३.१२.२०२२ अनुसार रु. १६,७०,६५८.०२/- | 24.12.2024 | Rs.14,88,000/- / Rs.1,48,800/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णनः** सदनिका क्र. जी-०३ (४२५ चौ. फू. क्षेत्रफळ), तळ मजला, घर क्र. ०१३२, मारेणुका निवास मालमत्ता क्र. केओपी-केओपी-०१३२, रेणुका निवास, रंजनदेवी मंदिराजवळ, सेक्टर – १९, कोपरखैरणे, नवी मुंबई. | | | |

**मालमत्ता (मत्तां) च्या पाहणीचा दिनांक आणि वेळ :: ०८-०७-२०२५ आणि १८-०७-२०२५ रोजी स. ११ वा. ते सायं. ४ वा. दरम्यान**
**बोली आणि इरठेच्या सादरीकरणासाठी दिनांक :: २३.०७.२०२५ रोजी स. ११:०० वा ते सायं. ५:०० वा. दरम्यान**
**लिलावाचा दिनांक आणि वेळ :: २४-०७-२०२५ रोजी स. ११:०० वा ते दु. २:०० वा.**

**इसारा रक्कम ठेव (इरठे) आयएनआर मध्ये ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि." च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावेत),** बोली सादर करण्याचे आणि लिलावाचे ठिकाणः उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. नानक अपार्टमेंट हॉटेल झायका समोर, खडकपाडा सर्कल जवळ, कल्याण मुरबाड रोड, वायले नगर, कल्याण ४२१३०१
(अनु. क्र. १,२,३,४,५,६,७,८)
**संपर्क तपशीलः कृष्णा सिंगः ७७६७८४७५८४, भक्ती नेना : ९२२४४७१४९४.) (अनु. क्र. १,२,३,४,५,६,७,आणि ८)**

**अटी आणि शर्ती :** ई- लिलाव "जसे आहे जेथे आहे" आणि "जसे आहे तसे आहे तत्वावर" करण्यात येणार आहे.
१. प्राधिकृत अधिकारी यांच्या माहितीनुसार कोणत्याही मालमत्तेवर कोणत्याही स्वरूपाचा भार नाही. मात्र मालमत्तेचे हक्क, हक्क संबंध तसेच त्यावरील भार आदी यांची माहिती तसेच मालमत्तेच्या संदर्भातील दावे, हक्क देणी आदी यांची माहिती जाणून घेण्यासाठी इच्छूक खरेदीदार यांनी मालमत्तेच्या संदर्भात स्वतंत्र चौकशी बोली सादर करण्याच्या पूर्वी करावी. इ लिलावाची जाहिरात म्हणजे वचन किंवा बँकेचे प्रतिनिधित्व नाही आणि असणार नाही. मालमता ही सध्याच्या आणि भविष्यातील भारांसह विक्री केली जात आहे जे बँकेला ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत. प्राधिकृत अधिकारी / संरक्षित धनको हे तृतीय पक्षकार यांचे हक्क, हक्क संबंध दावे अथवा देणी यांना जबाबदार असणार नाहीत.
२. बोली सादर करण्याच्या आधी मालमत्तेची चौकशी करणे आणि पाहणी करणे ही इच्छूक खरेदीदार यांची जबाबदारी आहे. लिलावासाठी ठेवण्यात आलेल्या मालमत्तांची पाहणी इच्छूक खरेदीदार यांना प्रत्येक मालमत्तेसमोर वरील प्रमाणे नमूद केलेल्या वेळेनुसार करता येईल.
३. इच्छूक खरेदीदार यांनी आपली बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडे वरील प्रमाणे नमूद केलेल्या लिलावाच्या तारखेच्या आधी एक दिवस सादर करणे आवश्यक आहे.
४. ई लिलाव उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा पुरवठादार मे. सी 1 इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याद्वारे करण्यात येईल. संपर्क व्यक्तीः प्रभाकरन एम - (मो क्र ७४१८२८१७०९). इच्छुक बोलीदारांना सल्ला देण्यात येत आहे की त्यांनी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देऊन मालमत्तेचा तपशील जाणून घ्यावा आणि बोली प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी आपली नावे नोंदविण्यासाठी https://www.bankeauctions.com ला भेट द्यावी आणि युजर आयडी आणि पासवर्ड प्राप्त करून घ्यावा. इच्छुक खरेदीदार यांना ई लिलावाच्या संदर्भात ऑनलाईन प्रशिक्षण सेवा पुरवठादार मेसर्स सी १ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, हेल्प लाईन क्रमांक ७२९१९१८८२४, २५, २६ इ मेल आयडी support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल https://www.bankeauctions.com येथे देण्यात येईल.
५. मालमत्तेची विक्री सर्वाधिक बोली सादर करणाऱ्याला करण्यात येईल मात्र ते संरक्षित धनको म्हणजेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांच्या मान्यतेस अधीन असेल. मात्र निम्नस्वाक्षरीकर यांना आवश्यकता भासल्यास इंटर से बिडिंग प्रक्रिया घेण्याचा निर्णय घेण्याची मुभा आहे. बोली स्वीकारण्याचा तसेच कोणतेही कारण न देता कोणतीही बोली / निविदा नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार याना आहे.
६. यशस्वी बोलीदार यांचे ईएमडी विक्री किमतीचा भाग म्हणून राखून ठेवले जाईल आणि अयशस्वी बोलीदार यांचे ईएमडी परत देण्यात येईल. ईएमडी रकमेवर कोणत्याही स्वरूपाचे व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीवर यांना विक्री किमतीच्या २५ % रक्कम ईएमडी ॲडजेस्ट करून प्राधिकृत अधिकारी यांच्याकडून बोली स्वीकारली गेल्यानंतर २४ तासांत अदा करणे आवश्यक आहे. आणि विक्री किमतीच्या उर्वरित ७५% रक्कम विक्री निश्चित झाल्याच्या १५ दिवसात किंवा परस्पर सहमतीने ठरलेल्या दिवशी जो तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही, त्या दिवशी प्राधिकृत अधिकारी यांनी मान्य केल्यानुसार अदा करणे आवश्यक आहे. यशस्वी बोलीदार यांनी वरील प्रमाणे नमूद केलेल्या अनुसार रक्कम अदा केली नाही या आधीच भरणा केलेली रक्कम जप्त होण्यास पात्र असेल आणि मालमत्ता पुन्हा इ लिलावाद्वारे विक्रीसाठी ठेवण्यात येईल आणि थकीत खरेदीदार यांचा मालमत्तेवर कोणताही अधिकार किंवा दावा करता येणार नाही.
७. सदर प्रसिद्धी सूचना अमलबजावणी होणाऱ्या मुद्द्यांना अनुसरून आहे.
८. बोलीदारांनी आपल्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण खंडित वीज / खंडित इंटरनेट आदींसाठी उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा पुरवठादार जबाबदार असणार नाहीत अशा घटना टाळण्यासाठी बोलीदारांना आवाहन करण्यात येते आहे की त्यांनी पॉवर सप्लाय बॅक अप आदींची सोय करून ठेवावी. ज्यायोगे त्यांना लिलाव प्रक्रियेत विना अडथळा सहभाग घेता येणे शक्य होईल.
ही सूचना वरील प्रमाणे नमूद केलेले कर्जदार / हमीदार / तारण दार यांना तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीच्या वेळापत्रकाची सूचना आहे.

**ठिकाणः मुंबई, दिनांक : ०१.०७.२०२५** **सही/- प्राधिकृत अधिकारी, उज्जीवन स्मॉल फायनांस बँक**